SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25
NOTES-8(TERM-II)
Subject - Marathi

std.8th

Prepared by: Renuka Joshi

LESSON- ८.या चिमण्यांच जगण .

**पूर्व उपक्रम – चिमणीचे चित्र चिकटून कविता लिहा.**

**शब्दार्थ.** **१.दारोदारी – प्रत्येक दारी** **२.माडी – उंचावरचे घर**

**३.निजली – झोपली** **४.कीव – दया**

**५. निर्दयी – दया नसलेला** **६. पांग – उपकार**

**७.सुंदर – छान** **८. हिंडणे – फिरणे**

**९. अंगण – घरासमोरची मोकळी जागा**

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१.चिमण्यांनी सुंदर माडी कशी बांधली?
उत्तर – काडी -काडी गोळा करून चिमण्यांनी सुंदर माडी बांधली.

२.चिमण्यांची सुंदर माडी कोण तोडत?
उत्तर – चिमण्यांची सुंदर माडी निर्दयी माणूस तोडत.

३. चिमण्यांचे जगण कसं आहे?
उत्तर – चिमण्यांचे जगण काडीसारखे आहे.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. चिमणी आपल्या पिल्लांना कशी सांभाळते?
उत्तर – वरील प्रश्न 'या चिमण्यांच जगण' या कवितेतील असून कवी अरविंद हंगरगेकर यांनी आपल्या कवितेतून चिमणीच्या जीवन प्रवासाचे वर्णन केले आहे.
चिमणी एकेक काडी गोळा करून मेहनतीने घरटे बांधते,तसेच दारोदार हिंडून आपल्या पिल्लांसाठी चोचीत दाने गोळा करून भरवते.
अशाप्रकारे चिमणी मोठ्या कष्टाने व मायेने आपल्या पिल्लांचा सांभाळ करते.

२.मानव चिमणीला कसा त्रास देतो?
उत्तर – चिमणी दारोदार हिंडून मोठ्या कष्टाने एकेक काडी गोळा करून घरटे तयार करते व निर्दयी माणूस कशाचाही विचार न करता आपल्या स्वार्थासाठी झाडे तोडतो,चिमणीचे घरटे त्यामुळे नष्ट होते.

२. कवीचे माणसाला काय सांगणे आहे?
उत्तर - कवी अरविंद हंगरगेकर यांनी आपल्या 'या चिमण्यांच जगण' या कवितेतून माणसाला माणसासारख वागण्यास व मुक्या प्राण्यांवर दया करण्यास सांगितले आहे.

**प्रश्न ३. समानार्थी शब्द लिहा.**

१. कीव - दया      २. निजली - झोपली      ३. पांग - उपकार

**प्रश्न ४. विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. आनंद x दुःख      ३. सुंदर x कुरूप

२. निर्दयी x दयाळू      ४. जगण x मरण

**प्रश्न ५. पुढील शब्दांना कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा.**

१. काडीच - माडीच      ३. मानवा - वणवा

२. चिमणी - अंगणी      ४. माणसा - जरासा

५. प्राण्याची - जन्म़ाची      ६. जीव - कीव

**पाठनंतरचा उपक्रम.**

सध्या पक्ष्यांची संख्या कमी होत आहे.त्यामागची कारणे सांगा व त्यासाठी काय करता येईल ते थोडक्यात लिहा.

**S.Teacher**      **HOD**      **Co –Ordinator**      **Principal**